उपरोक्त संदर्भीय विषयानुसार नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या सार्वजनिक दवाखान्यासाठी लागणारी औषधी व इतर साहित्य खरेदी करुन उपलब्ध ठेवणे व आवश्यकतेनुसार दवाखान्यासाठी वेळोवेळी पुरवठा करणे आवश्यक आहे. याबाबत संदर्भ क्र.१ नुसार वैद्यकीय आरोग्य अधिकारी म.न.पा. यांच्या अहवाला प्रमाणे आवश्यक ती औषधी केंद्र व राज्य शासन दर करारावर असणाऱ्या कंपन्या (१) मे. हाफकिन अजिंठा फार्मासुटीकल्स लि.जळगांव (२) मे. कर्नाटका ॲन्टीबायोटीक्स फार्मासुटीकल्स लि. बैंगलोर (३) झीम लॅब्रोटरीज लि.नागपुर या उत्पादन करणाऱ्या कंपन्या अथवा त्यांच्या अधिकृत पुरवठाधारकाकडून नियमाप्रमाणे रास्त दराने खरेदी करण्यासाठी लागणारी रक्कम रू. १७,४९,७०० /- (अक्षरी रूपये सतरा लाख एकोणपन्नास हजार सातसे फक्त) च्या खर्चास संदर्भ क्र. २ च्या अधिन राहून कार्यालयीन आदेश क्र.नांवाशमनपा/आवि/औभां/२६७३३/२०१३ दि.२१.१.२०१४ अन्वये प्रशासकीय व आर्थिक मंजूरी देण्यात आली त्याची नोंद घेणे बाबत.

**सभापती** नोंद घेण्यात येते.

**ठराव क्र. १९८** **ठराव**

**विषय** : औषधी व इतर साहित्य खरेदी करणे बाबत.

**संदर्भ** : १. वैद्यकीय आरोग्य अधिकारी यांचा अहवाल क्र.२१३८ दि. ०६/०५/२०१३.

२. मुंबई प्रांतीक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ क व ड अन्वये.

उपरोक्त संदर्भीय विषयानुसार नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या सार्वजनिक दवाखान्यासाठी लागणारी औषधी व इतर साहित्य खरेदी करुन उपलब्ध ठेवणे व आवश्यकतेनुसार दवाखान्यासाठी वेळोवेळी पुरवठा करणे आवश्यक आहे. याबाबत संदर्भ क्र. १ नुसार वैद्यकीय आरोग्य अधिकारी म.न.पा. यांच्या अहवाला प्रमाणे आवश्यक ती औषधी केंद्र व राज्य शासन दर करारावर असणाऱ्या कंपन्या (१) मे. हाफकिन अजिंठा फार्मासुटीकल्स लि.जळगांव (२) मे. कर्नाटका ॲन्टीबायोटीक्स फार्मासुटीकल्स लि. बैंगलोर (३) झीम लॅब्रोटरीज लि.नागपुर या उत्पादन करणाऱ्या कंपन्या अथवा त्यांच्या अधिकृत पुरवठाधारकाकडून नियमाप्रमाणे रास्त दराने खरेदी करण्यासाठी लागणारी रक्कम रू. १७,४९,७०० /- (अक्षरी रूपये सतरा लाख एकोणपन्नास हजार सातसे फक्त) च्या खर्चास संदर्भ क्र. २ च्या अधिन राहून कार्यालयीन आदेश क्र.नांवाशमनपा/आवि/औभां/२६७३३/२०१३ दि.२१.१.२०१४ अन्वये प्रशासकीय व आर्थिक मंजूरी देण्यात आली त्याची नोंद घेणे बाबत.

**विषय क्र.२२**

नांवामनपाकेच्या प्रशासकीय इमारतीमधील अग्नीशमन यंत्रणेची जमिनखालची पाईप लाईन काढून दुरुस्ती करुन ती पाईप लाईन जमिनी वरुन कार्यान्वीत करणे करीता इन्डो फायर सेफटी सोल्यूशन पुणे यांचे कोटेशन नुसार रु.१,७५,०००/- (अक्षरी रु.एक लक्ष पंच्याहत्तर हजार फक्त) खर्च अपेक्षित आहे. करीता सदरील कामाकरीता आदेश क्र.नांवाशमनपा/ अससे/६३७/२०१४ दि.६.१.२०१४ अन्वये प्रशासकीय व आर्थिक मान्यता देण्यात आली त्याची नोंद घेणे बाबत.

**सभापती** नोंद घेण्यात येते.

**ठराव क्र.१९९** **ठराव**

नांवामनपाकेच्या प्रशासकीय इमारतीमधील अग्नीशमन यंत्रणेची जमिनखालची पाईप लाईन काढून दुरुस्ती करुन ती पाईप लाईन जमिनी वरुन कार्यान्वीत करणे करीता इन्डो फायर सेफटी सोल्यूशन पुणे यांचे कोटेशन नुसार रु.१,७५,०००/- (अक्षरी रु.एक लक्ष पंच्याहत्तर हजार फक्त) खर्च अपेक्षित आहे. करीता सदरील कामाकरीता आदेश क्र.नांवाशमनपा/ अससे/६३७/२०१४ दि.६.१.२०१४ अन्वये प्रशासकीय व आर्थिक मान्यता देण्यात आली त्याची नोंद हि नांवाशमनपा स्थायी समिती सभा सर्वानुमते घेते.

**विषय क्र.२३**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक सालसन २०१३-१४ मध्ये रस्ते दुरुस्ती नाल्या दुरुस्ती या लेखाशिर्षकाखाली रू. २१०.०० लक्ष तरतुद ठेवण्यात आलेली असून आजपावेतो रू. २०९.०० लक्ष ची काम प्रस्तावित करण्यात आलेली आहे. रस्ते दुरुस्ती नाल्या दुरुस्ती नागरी गरीब लोकांना मुलभूत सुविधा या लेखा शिर्षाखाली रू.

१९०.०० लक्ष तरतुद ठेवण्यात आलेली असून रू. ११०.५० लक्ष ची कामे प्रस्तावित करण्यात आलेली आहे. नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, अंतर्गत सालसन २०१३-१४ करिता झोन क्र. १ ते ६ मधील वार्षीक देखभाल व दुरुस्तीची कामे करण्याकरिता निविदा सुचना प्रक्रिया पुर्ण करून कंत्राटदारस काम करण्यासाठी कार्यारंभ आदेश देण्यात आले आहे. त्यानपूसार झोन अंतर्गतची कामे प्रगती पथावर असून झालेल्या कामाची देयके अदायीसाठी सादर करण्यात आलेले आहे. सादर करण्यात आलेल्या देयकाची अदायगी झालेली नसल्यामुळे कंत्राटदार मुख्य रस्त्यावरील खड्डे बुजविण्यास असमर्थ ठरत आहे. या वर्षी पावसाळा जास्त प्रमाणात झालेला असल्यामुळे मुख्य रस्त्यावर बऱ्याच प्रमाणात खड्डे पडलेले आहे. पावसाळा संपुर्ण १ महिन्याचा कालावधी झालेला असून शहरात मुख्य रस्त्यावर मोठया प्रमाणात खड्डे पडलेले असल्यामुळे शहरातील नागरीकांना त्रास सहन करावा लागत आहे. सदर खड्डे डांबराने पॅचवर्क करून बुजविणे अत्यंत आवश्यक आहे. या व्यतिरिक्त (मार्च २०१४ अखेर पर्यत) कामे करावी लागणार आहेत. त्यासाठी तरतुद कमी असल्या करणने अपुऱ्या तरतूदी अभावी कामे होवू शकत नाही. पुरेशी तरतूद उपलब्ध करण्यासाठी रू. २४०.०० लक्ष ची वाढीव तरतूदीची आवश्यकता आहे.

| अ. क्र. | शिर्षक | अंदाजपयत्रकीय तरतुद | शिर्षनिहाय कमी करावयाची तरतुद | पुनरविनियोजन द्वारे वाढवयाची तरतुद **शिर्षक रस्ते, नाल्या दुरुस्ती** |
|---|---|---|---|---|
| १ | इमारत दुरुस्ती | १,००,००,००० | ५०,००,००० | ५०,००,००० |
| २ | शिवाजी नगर औद्योगिक वसाहत रस्ता विकसीत करणे. (२५/२१) | १,००,००,००० | ९५,००,००० | ९५,००,००० |
| ३ | JNNURM व इतर योजने अंतर्गत झालेल्या विकासकामाची देखभाल व दुरुस्ती (२५/१०) | १,००,००,००० | ९५,००,००० | ९५,००,००० |
| | | **३,००,००,०००** | **२,४०,००,०००** | **२,४०,००,०००** |

करिता अंदाजपत्रक सालसन २०१३-१४ मध्ये वर नमुद तक्यात दर्शविलेल्या शिर्षमधुन रस्ते दुरुस्ती नाल्या दुरुस्ती या शिर्षखाली रू. २,४०,००,००० लक्ष पुनरविनियोजन करणे साठी प्रस्ताव स्थायी समिती सभे समोर सादर.

**सभापती** पुनर विनियोजन करण्यास मान्यता देण्यात येते वहा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**ठराव क्र.२००** **ठराव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक सालसन २०१३-१४ मध्ये रस्ते दुरुस्ती नाल्या दुरुस्ती या लेखाशिर्षकाखाली रू. २१०.०० लक्ष तरतुद ठेवण्यात आलेली असून आजपावेतो रू. २०९.०० लक्ष ची काम प्रस्तावित करण्यात आलेली आहे. रस्ते दुरुस्ती नाल्या दुरुस्ती नागरी गरीब लोकांना मुलभूत सुविधा या लेखा शिर्षाखाली रू. १९०.०० लक्ष तरतुद ठेवण्यात आलेली असून रू. ११०.५० लक्ष ची कामे प्रस्तावित करण्यात आलेली आहे. नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, अंतर्गत सालसन २०१३-१४ करिता झोन क्र. १ ते ६ मधील वार्षीक देखभाल व दुरुस्तीची कामे करण्याकरिता निविदा सुचना प्रक्रिया पुर्ण करून कंत्राटदारस काम करण्यासाठी कार्यारंभ आदेश देण्यात आले आहे. त्यानपूसार झोन अंतर्गतची कामे प्रगती पथावर असून झालेल्या कामाची देयके अदायीसाठी सादर करण्यात आलेले आहे. सादर करण्यात आलेल्या देयकाची अदायगी झालेली नसल्यामुळे कंत्राटदार मुख्य रस्त्यावरील खड्डे बुजविण्यास असमर्थ ठरत आहे. या वर्षी पावसाळा जास्त प्रमाणात झालेला असल्यामुळे मुख्य रस्त्यावर बऱ्याच प्रमाणात खड्डे पडलेले आहे. पावसाळा संपुर्ण १ महिन्याचा कालावधी झालेला असून शहरात मुख्य रस्त्यावर मोठया प्रमाणात खड्डे पडलेले असल्यामुळे शहरातील नागरीकांना त्रास सहन करावा लागत आहे. सदर खड्डे डांबराने पॅचवर्क करून बुजविणे अत्यंत आवश्यक आहे. या व्यतिरिक्त (मार्च २०१४ अखेर पर्यत) कामे करावी लागणार आहेत. त्यासाठी तरतुद कमी असल्या करणने अपुऱ्या तरतूदी अभावी कामे होवू शकत नाही. पुरेशी तरतूद उपलब्ध करण्यासाठी रू. २४०.०० लक्ष ची वाढीव तरतूदीची आवश्यकता आहे.

| अ. क्र. | शिर्षक | अंदाजपयत्रकीय तरतुद | शिर्षनिहाय कमी करावयाची तरतुद | पुनरविनियोजन द्वारे वाढवयाची तरतुद **शिर्षक रस्ते, नाल्या दुरुस्ती** |
|---|---|---|---|---|
| १ | इमारत दुरुस्ती | १,००,००,००० | ५०,००,००० | ५०,००,००० |
| २ | शिवाजी नगर औद्योगिक वसाहत रस्ता विकसीत करणे. (२५/२१) | १,००,००,००० | ९५,००,००० | ९५,००,००० |
| ३ | JNNURM व इतर योजने अंतर्गत झालेल्या विकासकामाची देखभाल व दुरुस्ती (२५/१०) | १,००,००,००० | ९५,००,००० | ९५,००,००० |
| | | **३,००,००,०००** | **२,४०,००,०००** | **२,४०,००,०००** |

करिता अंदाजपत्रक सालसन २०१३-१४ मध्ये वर नमुद तक्यात दर्शविलेल्या शिर्षमधुन रस्ते दुरुस्ती नाल्या दुरुस्ती या शिर्षखाली रू. २,४०,००,००० लक्ष पुनरविनियोजन करण्यास ही नांवामनपा स्थायी समितीची सभा सर्वानुमते मान्यता देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**विषय क्र.२४**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्दीतआयडिएसएमटी योजने अंतर्गत हिंगोलीगेट वरील DP site No. A- येथे दुकान केंद्राचे बांधकाम करणे (रू.१०६२३३६५/-) साठी ई-टेंडर सेल द्वारे निविदा सुचना क्र.साबांवि/८२७१/२०१३ दि. २४.०७.२०१३ अन्वये दै. पुण्यनगरी/लोकपत्र यावर्तमान पत्रात दि. २५.०७.२०१३ रोजी निविदा प्रसिध्द करण्यात आली असता उपरोक्त कामासाठी एकुण ३ (तिन) निविदा प्राप्त झाल्या पात्र निविदा त्रिसदस्यीय समिती समोर दि. ०५.०९.२०१३ रोजी उघडण्यात आले. तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | कंत्राटदाराचे नाव | कंत्राटदाराने दिलेला दर |
|---|---|---|
| १ | श्री. डि. एम. पाटील कंत्राटदार | २२% जास्त दर |
| २ | श्री. आर. एम. हेंद्रे कंत्राटदार | १९% जास्त दर |
| ३ | श्री. शिवाजी नामदेवराव इंगळे कंत्राटदार | १७% जास्त दर |

तुलनात्मक तक्त्यानुसार सर्वात कमी दराची निविदा श्री. शिवाजी नामदेवराव इंगळे कंत्राटदार नांदेड यांची असुन ती अंदाजपत्रकीय दरापेक्षा १७ % जास्त दराची आहे. श्री. शिवाजी नामदेवराव इंगळे कंत्राटदार नांदेड यांनी भरलेले दर जास्त वाटत असल्याने दर कमी करण्यासाठी संबंधीतास वाटाघाटीसाठी पाचारण केले दि. १९.११.२०१३ रोजी मा. आयुक्त यांच्या कक्षात वाटाघाटी झाली असता वाटाघाटी अंती संबंधीत कंत्राटदाराने मा. आयुक्त यांचे समक्ष सदर काम अंदाजपत्रकीय दरापेक्षा ४% जास्त दराने करण्यास संमती दिल्यानंतर संबंधीताकडुन लेखी संमती प्राप्त करण्यात आली. त्यानुसार श्री शिवाजी नामदेवराव इंगळे कंत्राटदार नांदेड यांची वाटाघाटी अंती अंदाजपत्रक दरापेक्षा ४% जासत दराची निविदा मंजुरीस्तव व सदर कामासाठी लागणाऱ्या खर्चास प्र. व आ. मंजुरीस्तव प्रस्ताव स्थायी समिती समोर सादर.

**सभापती** तुलनात्म्क पत्रकानूसार सर्वात कमी दराची निविदा मंजुर करण्यास मान्यता देण्यात येते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**ठराव क्र.२०१** **ठराव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्दीतआयडिएसएमटी योजने अंतर्गत हिंगोलीगेट वरील DP site No. A- येथे दुकान केंद्राचे बांधकाम करणे (रू. १०६२३३६५/-) साठी ई-टेंडर सेल द्वारे निविदा सुचना क्र.साबांवि/८२७१/२०१३ दि. २४.०७.२०१३ अन्वये दै. पुण्यनगरी/लोकपत्र यावर्तमान पत्रात दि. २५.०७.२०१३ रोजी निविदा प्रसिध्द करण्यात आली असता उपरोक्त कामासाठी एकुण ३ (तिन) निविदा प्राप्त झाल्या पात्र निविदा त्रिसदस्यीय समिती समोर दि. ०५.०९.२०१३ रोजी उघडण्यात आले. तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | कंत्राटदाराचे नाव | कंत्राटदाराने दिलेला दर |
|---|---|---|
| १ | श्री. डि. एम. पाटील कंत्राटदार | २२% जास्त दर |
| २ | श्री. आर. एम. हेंद्रे कंत्राटदार | १९% जास्त दर |
| ३ | श्री. शिवाजी नामदेवराव इंगळे कंत्राटदार | १७% जास्त दर |

तुलनात्मक तक्त्यानुसार सर्वात कमी दराची निविदा श्री. शिवाजी नामदेवराव इंगळे कंत्राटदार नांदेड यांची असुन ती अंदाजपत्रकीय दरापेक्षा १७ % जास्त दराची आहे. श्री. शिवाजी नामदेवराव इंगळे कंत्राटदार नांदेड यांनी भरलेले दर जास्त वाटत असल्याने दर कमी करण्यासाठी संबंधीतास वाटाघाटीसाठी पाचारण केले दि. १९.११.२०१३ रोजी मा. आयुक्त यांच्या कक्षात वाटाघाटी झाली असता वाटाघाटी अंती संबंधीत कंत्राटदाराने मा. आयुक्त यांचे समक्ष सदर काम अंदाजपत्रकीय दरापेक्षा ४% जास्त दराने करण्यास संमती दिल्यानंतर संबंधीताकडुन लेखी संमती प्राप्त करण्यात आली. त्यानुसार श्री शिवाजी नामदेवराव इंगळे कंत्राटदार नांदेड यांची वाटाघाटी अंती अंदाजपत्रक दरापेक्षा ४% जासत दराची निविदा ही नांवामनपा स्थायी समितीची सभा सर्वानुमते मंजुर करते तसेच सदर कामासाठी लागणाऱ्या खर्चासही प्रशासकीय आर्थिक मान्यता ही नांवामनपा स्थायी समितीची सभा सर्वानुमते देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**विषय क्र.२५**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्दित आयडिएसएमटी योजने अंतर्गत आरक्षण क्र.१०५ बंजारा हॉस्पीटल येथे दुकान केंद्राचे बांधकाम करणे (रू. २,७९,४६,०००/-) साठी ई-टेंडर सेल द्वारे निविदा सुचना क्र. साबांवि/१०७६४/२०१३ दि. २८.०८.२०१३ अन्वये दै. लोकमत/एकमत या वर्तमान पत्रात दि. ३०.०८.२०१३ रोजी निविदा प्रसिध्द करण्यात आली असता उपरोक्त कामासाठी एकुण ४ (चार) निविदा प्राप्त झाल्या पात्र निविदा त्रिसदस्यीय समिती समोर दि.१०.१०.२०१३ रोजी उघडण्यात आले. तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | कंत्राटदाराचे नाव | कंत्राटदाराने दिलेला दर |
|---|---|---|
| १ | मे. पृथ्वी कंन्स्ट्रक्शन नांदेड | ४.९७ % जास्त दर |
| २ | मे. पुजा कंन्स्ट्रक्शन नांदेड | ११ % जास्त दर |

| | | |
|---|---|---|
| ३ | शारदा कंन्स्ट्रक्शन नांदेड | १३ % जास्त दर |
| ४ | मे.गणेश इंटर प्रायजेस नांदेड | १५ % जास्त दर |

तुलनात्मक तक्त्यानुसार सर्वात कमी दराची निविदा मे. पृथ्वी कंन्स्ट्रक्शन नांदेड कंत्राटदार नांदेड यांची असुन ती अंदाजपत्रकीय दरापेक्षा ४.९७ % जास्त दराची आहे. मे. पृथ्वी कंन्स्ट्रक्शन नांदेड यांनी भरलेले दर जास्त वाटत असल्याने दर कमी करण्यासाठी संबंधीतास वाटाघाटीसाठी पाचारण केले दि. २२.११.२०१३ रोजी मा. आयुक्त यांच्या कक्षात वाटाघाटी झाली असता वाटाघाटी अंती संबंधीत कत्राटदाराने मात्र आयुक्त यांचे समक्ष सदर काम अंदाजपत्रकीय दरापेक्षा ४ % जास्त दराने करण्यास संमती दिल्यानंतर मा. संबंधीताकडुन लेखी संमती प्राप्त करण्यात आली. त्यानुसार मे. पृथ्वी कंन्स्ट्रक्शन नांदेड यांची वाटीघाटी अंती अंदाजपत्रक दरापेक्षा ४ % जास्त दराची निविदा मंजुरीस्तव व सदर कामासाठी लागणाऱ्या खर्चास प्र. व आ. मंजुरीस्तव प्रस्ताव स्थायी समितीसमोर सादर.

**सभापती** तुलनात्म्क पत्रकानूसार सर्वात कमी दराची निविदा मंजुर करण्यास मान्यता देण्यात येते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**ठराव क्र.२०२** **ठराव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्दित आयडिएसएमटी योजने अंतर्गत आरक्षण क्र.१०५ बंजारा हॉस्पीटल येथे दुकान केंद्राचे बांधकाम करणे (रू. २,७९,४६,०००/-) साठी ई-टेंडर सेल द्वारे निविदा सुचना क्र. साबांवि/१०७६४/२०१३ दि. २८.०८.२०१३ अन्वये दै. लोकमत/एकमत या वर्तमान पत्रात दि. ३०.०८.२०१३ रोजी निविदा प्रसिध्द करण्यात आली असता उपरोक्त कामासाठी एकुण ४ (चार) निविदा प्राप्त झाल्या पात्र निविदा त्रिसदस्यीय समिती समोर दि.१०.१०.२०१३ रोजी उघडण्यात आले. तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | कंत्राटदाराचे नाव | कंत्राटदाराने दिलेला दर |
|---|---|---|
| १ | मे. पृथ्वी कंन्स्ट्रक्शन नांदेड | ४.९७ % जास्त दर |
| २ | मे. पुजा कंन्स्ट्रक्शन नांदेड | ११ % जास्त दर |
| ३ | शारदा कंन्स्ट्रक्शन नांदेड | १३ % जास्त दर |
| ४ | मे.गणेश इंटर प्रायजेस नांदेड | १५ % जास्त दर |

तुलनात्मक तक्त्यानुसार सर्वात कमी दराची निविदा मे. पृथ्वी कंन्स्ट्रक्शन नांदेड कंत्राटदार नांदेड यांची असुन ती अंदाजपत्रकीय दरापेक्षा ४.९७ % जास्त दराची आहे. मे. पृथ्वी कंन्स्ट्रक्शन नांदेड यांनी भरलेले दर जास्त वाटत असल्याने दर कमी करण्यासाठी संबंधीतास वाटाघाटीसाठी पाचारण केले दि. २२.११.२०१३ रोजी मा. आयुक्त यांच्या कक्षात वाटाघाटी झाली असता वाटाघाटी अंती संबंधीत कत्राटदाराने मात्र आयुक्त यांचे समक्ष सदर काम अंदाजपत्रकीय दरापेक्षा ४ % जास्त दराने करण्यास संमती दिल्यानंतर मा. संबंधीताकडुन लेखी संमती प्राप्त करण्यात आली. त्यानुसार मे. पृथ्वी कंन्स्ट्रक्शन नांदेड यांची वाटीघाटी अंती अंदाजपत्रक दरापेक्षा ४ % जास्त दराची निविदा ही नांवामनपा स्थायी समितीची सभा सर्वानुमते मंजुर करते तसेच सदर कामासाठी लागणाऱ्या खर्चासही प्रशासकीय आर्थिक मान्यता ही नांवामनपा स्थायी समितीची सभा सर्वानुमते देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**विषय क्र.२६**

महानगरपालिका हद्दीत प्रभाग क्र.२० मध्ये क्लब हाऊस ते डंकीनकडे जाणारा रस्ता सिमेंट रस्ता करणे साठी अंदाजित किंमत रुपये ४७,५३,७५४/-च्या कामासाठी दैनिक पुण्यनगरी व दैनिक उदयाचा मराठवाडा या वर्तमान पत्रातून दिनांक ०८.११.२०१३ रोजी निविदा प्रसिध्द केली आसता एकूण ३ (तिन) निविदा प्राप्त झाल्या पात्र निविदा त्रीसदस्यीय समीती समोर दिनांक २.१२.२०१३ रोजी उघडयात आले आसता त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| अ.क्रं. | कंत्राटदाराचे नांव | निविदेतील भरलेला दर |
|---|---|---|
| १. | सोहेल कन्स्ट्रक्शन, नांदेड | ९.४० % जास्त दर |
| २. | आशा कन्स्ट्रक्शन, नांदेड | ८%/ जास्त दर |
| ३ | एल.अँन्ड.एस. कन्स्ट्रक्शन , नांदेड | ७.२०% जास्त दर |

तुलनात्मक तक्त्यानुसार सर्वात कमी दराची निविदा एल.अँन्ड.एस कन्स्ट्रक्शन यांची असून जी अदाजपत्रकीय दरापेक्षा ७.२० % जास्त दराची आसल्यामूळे सदरील दर जास्त वाटत आसल्यामूळे सदरील कंत्राटदरास वाटाघाटी साठी पाचारण केले आसता सदरील कंत्राटदाराने **वाटाघाटी अंती प्रस्तूत काम ७.२० % जास्त दराएवजी अंदाजपत्रक दराने काम करण्याची लेखी संमती दिलेली आहे.** करीता विषयांकित कामासाठी एल.अँन्ड.एस.कन्स्ट्रक्शन यांची वाटाघाटी अंती ७.२० % जास्त दराऐवजी **अंदाजपत्रक दराने** निविदा मंजूरीसाठी प्रस्ताव स्थायी समिती समोर सादर.

**सभापती** अंदाजपत्रक दराची निविदा मंजुर करण्यास मान्यता देण्यात येते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**ठराव क्र. २०३** **ठराव**

महानगरपालिका हद्दीत प्रभाग क्र.२० मध्ये क्लब हाऊस ते डंकीनकडे जाणारा रस्ता सिमेंट रस्ता करणे साठी अंदाजित किंमत रुपये ४७,५३,७५४/-च्या कामासाठी दैनिक पुण्यनगरी व दैनिक उदयाचा मराठवाडा या वर्तमान पत्रातून दिनांक ०८.११.२०१३ रोजी निविदा प्रसिध्द केली आसता एकूण ३ (तिन) निविदा प्राप्त झाल्या पात्र निविदा त्रीसदस्यीय समीती समोर दिनांक २.१२.२०१३ रोजी उघडयात आले आसता त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| अ.क्रं. | कंत्राटदाराचे नांव | निविदेतील भरलेला दर |
|---|---|---|
| १. | सोहेल कन्स्ट्रक्शन, नांदेड | ९.४० % जास्त दर |
| २. | आशा कन्स्ट्रक्शन, नांदेड | ८%/ जास्त दर |
| ३ | एल.अँन्ड.एस. कन्स्ट्रक्शन , नांदेड | ७.२०% जास्त दर |

तुलनात्मक तक्त्यानुसार सर्वात कमी दराची निविदा एल.अँन्ड.एस कन्स्ट्रक्शन यांची असून जी अदाजपत्रकीय दरापेक्षा ७.२० % जास्त दराची आसल्यामूळे सदरील दर जास्त वाटत आसल्यामूळे सदरील कंत्राटदरास वाटाघाटी साठी पाचारण केले आसता सदरील कंत्राटदाराने **वाटाघाटी अंती प्रस्तूत काम ७.२० % जास्त दराएवजी अंदाजपत्रक दराने काम करण्याची लेखी संमती दिलेली आहे.** करीता विषयांकित कामासाठी एल.अँन्ड.एस.कन्स्ट्रक्शन यांची वाटाघाटी अंती ७.२० % जास्त दराऐवजी **अंदाजपत्रक दराची** निविदा ही नांवामनपा स्थायी समितीची सभा सर्वानुमते मंजुर करते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**विषय क्र.२७**

दिनांक १९ नोव्हेंबर ते २८ नोव्हेंबर २०१३ या कालावधीत होणाऱ्या सैन्य भरती साठी येणाऱ्या उमेदवारांना पाणी पिण्यासाठी पाण्यांच्या आक्या उपलब्ध करून देणे साठी कनिष्ठ/ उपअभियंता यांनी सादर केलेला अहवालानुसार २०१२१-१३ च्या म.जि.प्रा. च्या जिल्हा दर सुची नुसार अंदजीत किंमत रूपये ६८,२२६/- ऐवढी होत असुन सदर काम तातडीने आवश्यक व कमी कालावधीत करावयाचे असल्यामुळे गुत्तेदार श्री के.जी. परळीकर, नांदेड यांच्या कडुन घेण्यात आले. सदरील रक्कम मा. जिल्हाधिकारी कार्यालय नांदेड यांच्या कडुन खर्चाचे समायोजन करणार आहे. या कामा करिता झालेल्या खर्चास रू. ६८,२२६/- निवीदा न मागविता रास्त दराने (अक्षरी रू. आडुसष्ट हजार दोनशे सव्वीस फक्त) संबंधीतास अदाई करण्यासाठी कार्योत्तर प्रशासकीय व आर्थिक मान्यता प्रदान करणेसाठी प्रस्ताव येत्या स्थायी समिती समोर सादर.

**सभापती** कार्योत्तर प्रशासकीय व आर्थिक मान्यता देण्यात येते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**ठराव क्र.२०४** **ठराव**

दिनांक १९ नोव्हेंबर ते २८ नोव्हेंबर २०१३ या कालावधीत होणाऱ्या सैन्य भरती साठी येणाऱ्या उमेदवारांना पाणी पिण्यासाठी पाण्यांच्या आक्या उपलब्ध करून देणे साठी कनिष्ठ/ उपअभियंता यांनी सादर केलेला अहवालानुसार २०१२१-१३ च्या म.जि.प्रा. च्या जिल्हा दर सुची नुसार अंदजीत किंमत रूपये ६८,२२६/- ऐवढी होत असुन सदर काम तातडीने आवश्यक व कमी कालावधीत करावयाचे असल्यामुळे गुत्तेदार श्री के.जी. परळीकर, नांदेड यांच्या कडुन घेण्यात आले. सदरील रक्कम मा. जिल्हाधिकारी कार्यालय नांदेड यांच्या कडुन खर्चाचे समायोजन करणार आहे. या कामा करिता झालेल्या खर्चास रू. ६८,२२६/- निवीदा न मागविता रास्त दराने (अक्षरी रू. आडुसष्ट हजार दोनशे सव्वीस फक्त) संबंधीतास अदाई करण्यासाठी कार्योत्तर प्रशासकीय व आर्थिक मान्यता ही नांवामनपा स्थायी समितीची सभा सर्वानुमते देते. व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**विषय क्र.२८**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या हद्दीत प्रभाग क्र. २४ क मुजाहिद चौक बोंढार जलकुंभाची रायझींग मेन व वितरण जलवाहीनी ४५ अंशाप्रमाणे एकमेकाला चिटकून आहे. सदरचा भाग काळया मातीचा असल्याने जडवाहनाच्या वाहतूकीमुळे जागोजागी खचलेली आहे. सदर वाहतुकीमुळे रायजिंग मेन ला लिकेज निर्माण झालेले आहे. या कारणाने पाणी वाया जात आहे. बोंढार जलकुंभ भरून घेण्यासाठी विलंब लागत आहे. सदर गळती मुळे माती ओली होत असल्याने याचे परिणाम मुख्य वितरण वाहिणीवर झाल्याने यातुन सुध्दा पाणी गळती सुरु झालेली आहे. गळती मुळे रस्ता चिखलमय होऊन माती खचुन गेल्याने वाहतुक बंद पडलेली आहे. दुरुस्ती चे काम करणे आवश्यक असल्याने उपलब्ध असलेले कंत्राटदार मे. इंद्रजा कन्सट्रक्शन, उस्मानाबाद यांच्या कडुन प्रचलीत दर सुची नुसार अंदाजपत्रकीय दराव काम पुर्ण करून घेण्यात आले आहे. सदर काम हे दि.११.१२.२०१३ रोजी पुर्ण करून दिलेले आहे. दुरुस्तीच्या कामासाठी एकुण खर्च रू.२,२०,५३०/- रास्त दराने (अक्षरी रूपये- दोन लक्ष विस हजार पाचशे तीस) यास अदाई करण्यासाठी कार्योत्तर प्रशासकीय व आर्थिक मान्यता प्रदान करणेसाठी प्रस्ताव येत्या स्थायी समिती समोर सादर.

**सभापती** कार्योत्तर प्रशासकीय व आर्थिक मान्यता देण्यात येते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात

येतो.

**ठराव क्र.२०५** **ठराव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या हद्दीत प्रभाग क्र. २४ क मुजाहिद चौक बोंढार जलकुंभाची रायझींग मेन व वितरण जलवाहीनी ४५ अंशाप्रमाणे एकमेकाला चिटकून आहे. सदरचा भाग काळया मातीचा असल्याने जडवाहनाच्या वाहतूकीमुळे जागोजागी खचलेली आहे. सदर वाहतुकीमुळे रायजिंग मेन ला लिकेज निर्माण झालेले आहे. या कारणाने पाणी वाया जात आहे. बोंढार जलकुंभ भरून घेण्यासाठी विलंब लागत आहे. सदर गळती मुळे माती ओली होत असल्याने याचे परिणाम मुख्य वितरण वाहिणीवर झाल्याने यातुन सुध्दा पाणी गळती सुरु झालेली आहे. गळती मुळे रस्ता चिखलमय होऊन माती खचुन गेल्याने वाहतुक बंद पडलेली आहे. दुरुस्ती चे काम करणे आवश्यक असल्याने उपलब्ध असलेले कंत्राटदार मे. इंद्रजा कन्सट्रक्शन, उस्मानाबाद यांच्या कडुन प्रचलीत दर सुची नुसार अंदाजपत्रकीय दराव काम पुर्ण करून घेण्यात आले आहे. सदर काम हे दि.११.१२.२०१३ रोजी पुर्ण करून दिलेले आहे. दुरुस्तीच्या कामासाठी एकुण खर्च रू.२,२०,५३०/- रास्त दराने (अक्षरी रूपये- दोन लक्ष विस हजार पाचशे तीस) यास अदाई करण्यासाठी कार्योत्तर प्रशासकीय व आर्थिक मान्यता ही नांवामनपा स्थायी समितीची सभा सर्वानुमते देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**विषय क्र.२९**

**विषय:-** औषधी व सर्जिकल साहित्य खरेदी करणे बाबत.

**संदर्भ:-** १. पशुवैद्यकीय अधिकारी यांचे पत्र क्र.२१४५९ दिनांक ३० नोव्हेंबर २०१३

२. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ खंड क व ड अन्वये

उपरोक्त संदर्भीय विषयानुसार नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या पशुवैद्यकीय दवाखाना येथे श्वान निर्बिजीकरण व लसीकरण कार्यक्रम राबविण्यासाठी संदर्भ क्र.१ अन्वये निविदा दर करारावर मे.पराग एजन्सी, नांदेड यांच्याकडून औषधी व सर्जिकल साहित्य खरेदी करण्यासाठी लागणारी रक्कम रू.१,४१,६७२/- (अक्षरी रूपये एक लाख एकेचाळीस हजार सहाशे बहात्तर फक्त) च्या रक्कमेस संदर्भ क्र.२ च्या अधिन राहून प्रशासकीय व आर्थिक मंजूरी देण्यात येते. यावर होणारा खर्च हा साल सन २०१३-१४ च्या म.न.पा. अंदाजपत्रकाच्या संबंधीत लेख शिर्षकातून करण्यात यावा.

**सभापती** नोंद घेण्यात येते.

**ठराव क्र. २०६** **ठराव**

**विषय:-** औषधी व सर्जिकल साहित्य खरेदी करणे बाबत.

**संदर्भ:-** १. पशुवैद्यकीय अधिकारी यांचे पत्र क्र.२१४५९ दिनांक ३० नोव्हेंबर २०१३

२. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ खंड क व ड अन्वये

उपरोक्त संदर्भीय विषयानुसार नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या पशुवैद्यकीय दवाखाना येथे श्वान निर्बिजीकरण व लसीकरण कार्यक्रम राबविण्यासाठी संदर्भ क्र.१ अन्वये निविदा दर करारावर मे.पराग एजन्सी, नांदेड यांच्याकडून औषधी व सर्जिकल साहित्य खरेदी करण्यासाठी लागणारी रक्कम रू.१,४१,६७२/- (अक्षरी रूपये एक लाख एकेचाळीस हजार सहाशे बहात्तर फक्त) च्या रक्कमेस संदर्भ क्र.२ च्या अधिन राहून प्रशासकीय व आर्थिक मंजूरी देण्यात आली. त्याची नोंद हि नांवाशमनपा स्थायी सभा सर्वानुमते घेते.

**विषय क्र.३०**

**प्रति,**
**मा. सभापती,**
**स्थायी समिती,**
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका,
नांदेड.

**विषय :- <u>निलंबन प्रकरणी शास्ती लादल्याबाबात.</u>**

**महोदय,**

वरील विषयी मला कार्यालयाने दि. २४.१०.२०१३ चे आदेशाद्वारे भुतपूर्व तरोड (खु,) व तरोड (बु.) या ग्रामपंचायतीमधील कर्मचाऱ्यांना सेवेत सामावून घेताना त्रुटी झाल्याचा दोष माझ्यावर ठेऊन मला गंभीर शास्ती लादली आहे. प्रशासनाने काढलेल्या आदेशात खालील त्रुटी नमुद केल्या आहेत.

१. कर्मचाऱ्यांना सामावून घ्येण्याचा प्रस्ताव सविस्तर नाव, वय व शिक्षणासह सादर केला नाही.
२. ग्रामपंचायत कडील कर्मचाऱ्यांचे नेमणुकीच्या वेळी वय अधिक होते किंवा कमी होते.
३. २४ कर्मचारी मनपात सामावून घेण्याचा प्रस्ताव नगर सचिवामार्फत सादर केलेला नाही.

याबाबत मी माझे स्पष्टीकरण खालील प्रमाणे सादर करीत आहे.

१. शासनाने भूतपूर्व तरोडा (खु.) (बु.) या दोन ग्रामपंचायत क्षेत्राचा समावेश दि. ०१.०७.२००९ रोजी महापालिकेत समावेश केला आहे.
२. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४९३ संक्रमणकालीन तरतुदीनुसार परिशिष्ट ४ मधील भाग १ चे नियम ५(क) नुसार स्थानिक प्राधिकरणाचा समावेश झालेल्या भागातील त्या तारखेपुर्वीच्या सर्व नेमणुका महापालिकेच्या नेमणुका होत्या असे गृहीत धरण्याची तरतुद आहे.
३. या नियमातील तरतुदीनुसार महापालिका सर्वसाधारण सभेने दि. १८.८.२००९ रोजी ठराव क्र. ८३ द्वारे या २४ कर्मचाऱ्यांना सेवेत सामावून घेण्याचा ठराव पारीत केला होता. या ठरावाच्या अनुषंगाने मा. प्रधानसचिव नगरविकास विभाग, मंत्रालय मुंबई-३२ यांना मान्यतेसाठी प्रस्ताव सादर केला होता.
४. शासनाने या प्रस्तावास शासन निर्णय क्र. नांवाशमनपा-२०१०/५१४/प्र.क्र.८६/०७//नबि-२४/दि.०३ जुलै-२०१० रोजी शासन मान्यता प्रदान केली होती. त्यामध्ये वरीष्ठ लिपीक-४, कनिष्ठ लिपीक-११, शिपाई-९ या प्रमाणे पदे मान्य करण्यात आली.
५. महापालिकेने शासन निर्णयानुसार सर्वसाधारण सभेची दिञ. ३०.०६.२०११ रोजी ठराव क्र.३७ द्वारे मान्यता घेऊन या २४ कर्मचाऱ्यांना दि. २९.०८.२०११, २३.०१.२०१२ व ०८.०६.२०१२ आदेशाद्वारे सेवेत सामावून घेतले आहे. सेवेत सामावून घेत असतांना महापाकिने ४ कर्मचाऱ्यांना वरीष्ठ लिपीक पदी नियुक्ती न दिल्यान संबंधीत ४ कर्मचाऱ्यांनी मा. उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद येथे याचिका क्र.१३४२/२०१२ द्वारे प्रकरण न्यायप्रविष्ठ केले होते.
६. मा. उच्च न्यायालय येथे याचिका क्र. १३४२/२०१२ मध्ये दि. १२ सप्टेंबर-२०१२ रोजी शासनास ६ आठवडयाच्या आत प्रकरणाची तपासणी करून निर्णय देण्याबाबत निर्देश झाले होते. या निर्देशानुसार नगर विका विभागाने दि. ३०-एप्रिल-२०१३ च्या पत्राद्वारे शासनाचे दि. ०३.०७.२०१० रोजीचे आदेश क्र. २०१०/५१४/प्र.क्र.८६/०७ नबि-२४ हे नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेने केलेल्या सर्वसाधारण सभा ठराव क्र.८३ दि. १८.०८.२००९ नुसार दिलेली सहमती विचारात घेऊन तसेच या बाबतच्या नियमाच्या सर्व तरतुदी विचारात घेऊन काढण्यात आले आहेत. प्रस्तुत प्रकरणी शासनाच्या दि. ०३ जुलै-२०१० च्या शासन निर्णयानुसार कार्यवाही होणे आवश्यक असल्योच कळविले आहे.
७. तसेच शासनानी नियुक्तीच्या दिनांकास अधिकचे वय क्षमापित करण्याबाबत दि.२३-एप्रिल-२०१२ चे पत्राद्वारे शासननिर्णय नांवाशमनपा क्र.२०१०/५१४/प्र.क्र.८६/०७ नबि-२४ अन्वये कर्मचाऱ्यांच्या सेवा सामावून घेण्यास मान्यता दिली असून मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४९३ संक्रमण कालीन तरतुदीनुसार परिशिश्ट ४ मधील भाग -१ नियम-५ क नुसार स्थानिक प्राधिकरणाचा समावेश झालेल्या भागातील त्या तारखेपुर्वीच्या सर्व नेमणुका महानगरपालिकेल्या होत्या असे गृहीत धरुन सेवा सामावून घेतले आहे. त्यानुसार नियुक्ती प्राधिकारी म्हणुन आयुक्त महापालिका हे सक्षम असल्याचे कळविले आहे.
८. शास्तीच्या आदेशामध्ये सदर प्रकरणाची संचिका सहा. आयुक्त,(आस्थापन) यांच्यामार्फत सादर न करता रास्तपणे उपायुक्त, व आयुक्तांकडे सादर केल्याचा दोष नमुद करण्यात आला आहे. परंतु याबाबत मी नमुद करु इच्छितो की, तत्कालीन मा. आयुक्त, मा. उपायुक्त, अथवा शासनाने कधीही आक्षेप घेतलेला नाही.

आदरणीय महोदय कृपया याबाबत महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपी) नियम १९७९ नियम ९ नुसार गंभीर शास्ती लादण्यापुवी भारतीय संविधानाच्या कलम ३११ (२) च्या तरतुदीत तसेच चमहाराष्ट नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम १९७९ च्या नियम ८ नुसार विभागीय चौकशी पुर्ण झाल्यानंतर चौकशी अहवालाची प्रत मला देऊन १५ दिवसांच्या आत बाजु मांडण्याची संधी असतांना ती संधी न देता अथवा चौकशी अहवालाची प्रतही न पुरविता वर प्रमाणे शसन मान्यता व शासनाचे निर्देश विचारात न घेता माझ्यावर गंभीर शास्ती लादली आहे. त्याचा सहानुभूतीपूर्वक फेरविचार करुन सदरची शास्ती रद्द करावी अशी आपणास सविनय विनंती आहे

आपला नम्र,
**स्वाक्षरीत/-**
सुरेश गोविंदराव कुलकर्णी
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.

**प्रशासकिय टिप्पणी**

उपरोक्त विषयास अनुसरुन संदर्भीय पत्रा सोबत प्राप्त झालेल्या श्री सुरेश गोविंदराव कुलकर्णी तत्कालीन प्रभारी कार्यालय अधिक्षक यांनी मा. सभापती स्थायी समिती मनपा नांदेड यांच्याकडे सादर केलेल्या अपिलानुसार प्रशासकिय अहवाल खालील प्रमाणे प्रशासना मार्फत सविस्तर माहिती देण्यात येते.

| अ.क्र. | अर्जदाराचे मुद्दे | प्रशासनाचे स्पष्टीकरण |
|---|---|---|
| 1 | शासनाने भुतपुर्व तरोडा खु. व बु. या दोन ग्रामपंचायत | अर्जदाराचे म्हणणे बरोबर आहे |

<table>
<tr><td></td><td>क्षेत्राचा समावेश दि. 01.07.2009 रोजी महापालिकेत समाविष्ट केला आहे</td><td></td></tr>
<tr><td>2</td><td>मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 493, संक्रमणकालीन तरतुदीनुसार परिशिष्ट 4 मधील भाग-1 चे नियम 5 (क) नुसार स्थानिक प्राधिकरणाचा समावेश झालेल्या भागातील त्या तारखे पुर्वीच्या सर्व नेमणुका महापालिकेच्या नेमणुका होत्या असे गृहीत धरण्याची तरतुद आहे</td><td>ग्राम पंचायतीला कर्मचारी मंजुरी बाबत शासनाचे आकृतीबंधानुसार 10,000 लोकसंख्येच्या वरील खालील प्रमाणे शासन निर्देश आहेत.<br>महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रं. पिपिएस/2699/ प्र.क्र.206 (1)/21 मंत्रालय मुंबई दिनांक 21 जानेवारी 2000 मधील तरतुदीनुसार ग्रामपंचायत कर्मचा-यांचा आकृतीबंध व कर्मचा-यांना किमान वेतनासाठी द्यावयाचा अनुदान इत्यादी बाबत तरतुद दर्शविली असुन लोकसंख्येच्या प्रमाणे कर्मचा-यांची संख्या खालील प्रमाणे आहे.
<table>
<tr><th>ग्रामपंचायत वर्ग</th><th>कर्मचारी संख्या</th><th>कर्मचा-यांचा प्रकार (प्रति ग्रामपंचायत)</th></tr>
<tr><td>लोकसंख्या 10,000 वरील ग्रामपंचायत</td><td>06</td><td>लिपीक / वसुली कारकुन - 02<br>शिपायी-1<br>पाणी पुरवठा/ दिवाबत्ती कर्मचारी-01<br>सफाई कामगार-02</td></tr>
</table>
परंतु ग्रामपंचायत मध्ये दर्शविलेल्या पदानुसार शासन निर्णयाची अमलबजवणी केलेली नाही. अथवा प्रशासना समोर तसे निर्णय घेण्यासाठी सादर केलेले नाही.</td></tr>
</table>

<table>
<tr><td>3</td><td>या नियमातील तरतुदीनुसार महापालिका सर्व साधारण सभेने दि. 18.08.2009 रोजी ठराव क्रं. 83 व्दारे या 24 कर्मचा-यांना सेवेत सामावुन घेण्याचा ठराव पारीत केला होता. या ठरावाच्या अनुषंगाने तत्कालीन आयुक्तांनी 24 पदाचे वर्गीकरण करुन पदनिर्मितीसह सेवेत सामावुन घेण्यासाठी दिनांक 03.05.2010 रोजी मा. प्रधान सचिव, नगरविकास विभाग, मंत्रालय मुंबई-32 यांना शासन मान्यतेसाठी प्रस्ताव सादर केला होता.</td><td>दिनांक 18.08.2009 रोजी झालेल्या मनपा सर्व साधारण सभेत विशेष बाब म्हणुन आयत्या वेळी घेण्यात आलेले विषय सर्व साधारण सभेत घेण्यात आले होते. ज्या मध्ये तरोडा बु. खु. ग्राम पंचायत मधील 24 कर्मचा-यांना सेवेत सामावुन घेण्या बाबत सन्माननीय सदस्यांनी ठेवलेल्या प्रस्तावास ठराव क्रं. 83 दिनांक 18.08.2009 रोजी पारीत होवुन त्यामध्ये वर्ग-3 व वर्ग-4 या पदावरील एकूण 24 कर्मचा-यांना पदनिर्मितीसह शासन मान्यतेने मनपा सेवेत सामावुन घेण्यास मान्यता देण्यात आली.<br>तथापि सदरील प्रस्ताव प्रशासना मार्फत सादर केला नव्हता सर्व साधारण सभेने आयत्या वेळी वर्ग-3 व वर्ग-4 असे एकूण 24 कर्मचा-यांना शासन मान्यतेने सामावुन घेण्यास मान्यता दिली. ज्यामध्ये वर्ग-3 व वर्ग-4 मध्ये किती कर्मचारी आहे व त्यांचे पदनाम काय आहे या बाबतचा उल्लेख करण्यात आलेला नाही.<br>सदरील ठरावाच्या अनुषंगाने ग्रामपंचायत तरोडा बु.</td></tr>
</table>

| | | |
|---|---|---|
| | | व खु. मध्ये कार्यरत असलेल्या कर्मचा-यांना सामावुन घेण्या बाबत तत्कालीन आयुक्तांनी सर्व नियमासह सादर करण्या बाबत पृष्ठांकन केले असतांनाही श्री सुरेश गोविंदराव कुलकर्णी तत्कालीन प्र. कार्यालय अधिक्षक यांनी तसे सादर न करता ठरावाचा संदर्भ दर्शवुन तरोडा बु. व खु. मध्ये कार्यरत असलेल्या कर्मचा-याचे नांव, वय, नियुक्तीचेपदनाम, वेतनश्रेणी, शैक्षणिक पात्रता, जातप्रवर्ग इत्यादी बाबी न दर्शविता वरिष्ठ लिपीक-4 लिपीक-11 व शिपायी-9 असे दर्शवुन प्रस्ताव शासनास सादर करण्यात आला.<br>**तसेच द्वि सदस्य समितीने** तरोडा खु व बु. या ग्राम पंचायतीकडरील 24 कर्मचा-यांना महानगरपालिका सेवेत सामावुन घेण्याची कार्यवाही बाबत सादर केलेल्या संचिकेचे अवलोकन केले असता असे निदर्शनास येते की, संचिकेत दोनही ग्रामपंचायतीकडील कर्मचा-यांना नावाचा, त्यांच्या पदाचा, त्याना देण्यात येणा-या एकत्रीत वेतनाचा टिप्पणीत उल्लेख नाही. तसेच संचिकेत वेळोवेळी सहाय्यक आयुक्त, उपआयुक्त व आयुक्त यांनी वेळोवेळी घेतलेल्या आक्षेपा बाबत / त्रुटीबाबत यथायथोचित खुलासा माहिती संबंधीत कार्यालय अधिक्षक यांनी दिली नसल्याचे किंवा त्रोटक स्वरुपात सादर केल्याचे दिसुन आलेले आहे असे अहवालात नमुद आहे<br>तसेच विभागीय चौकीशी अंती चौकशी अधिका-यांनी ग्रामपंचायत तरोडा बु. व खु. ग्रामपंचायती मधील 24 कर्मचा-यांना मनपा नांदेड सेवेत 4 वरिष्ठ लिपीक पदासह मनपा ठराव व शासन मान्यतेने सामावुन घेण्यात आले आहे. सदरील कर्मचारी सामावुन घेण्याचा प्रस्ताव सविस्तर कर्मचारी यांचे नांव, वय, व शिक्षणासह शासनास सादर करावयास हवा होता त्यात ग्रामपंचायतकडील नेमणुकीच्या वेळी वय अधिक होते किंवा कमी होते याची शासनास संपूर्ण माहिती देवुन शिथीलता मान्य करुन घ्यावयाची होती असे घडले नाही. तसेच सहाय्यक आयुक्त श्री विलास भोसीकर हयांनी काढलेल्या त्रुटी नंतर संचिका त्यांच्या मार्फत परत सादर झालेली नाही. 24 कर्मचारी मनपाकेत सामावुन घेण्याचा प्रस्ताव नियमानुसार नगरसचिवा मार्फत सादर झालेला नाही अशा त्रुटी निदर्शनास आल्याचे नमुद आहेत. त्यामुळे संबंधीतांचे म्हणणे चुकीचे आहे. |
| 4 | शासनाने या प्रस्तावास शासन निर्णय क्रं. नावाशमनपा-2010/514/प्र.क्र.86/07/नवि-24 दि. 03 जुलै 2010 रोजी शासन मान्यता प्रदान केली होती. त्या मध्ये वरिष्ठ लिपीक-4, कनिष्ठ लिपीक-11, शिपायी-9 या प्रमाणे पदे मान्य करण्यात आले. | वरील बाब विचारात घेता मनपा प्रशासनाची दिशाभुल करुन प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात आला.<br>नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका कार्यालयाने पाठविलेल्या प्रस्तावास शासनाने मान्यता दिली हे बरोबर आहे. |
| 5 | महापालिकेने शासन निर्णयानुसार सर्व साधारण सभेचे | द्विय सदस्य समितीने दिनांक 05.10.2010 रोजी |

 F:\SHATALWAR_N_B\SC\MR.PAWALE\०४.०२.२०१४\MINUTEBOOK.doc

| | | |
|---|---|---|
| | दि. 30.06.2011 रोजी ठराव क्रं. 37 व्दारे मान्यता घेवुन या 24 कर्मचा-यांना दि. 29.08.2011, 23.01.2012 व 08.06.2012 आदेशाव्दारे सेवेत सामावुन घेतले आहे. सेवेत सामावुन घेत असतांना महापालिकेने 4 कर्मचा-यांना वरिष्ठ लिपीक पदी नियुक्ती न दिल्याने संबंधीत 4 कर्मचा-यांनी मा. उच्च न्यायालय खंडपिठ औरंगाबाद येथे याचिका क्रं. 1342/2012 व्दारे प्रकरण न्याय प्रविष्ठ केले होते. | वरिष्ठ लिपीक या पदावरील 4 कर्मचा-यांना वरिष्ठ लिपीक म्हणुन सामावुन घेतल्यास कायदेशीर अडचण निर्माण होतील त्यामुळे वरिष्ठ लिपीक ऐवजी त्या 4 कर्मचा-यांना लिपीक या पदावर सामावुन घेणे उचीत होईल कर्मचा-यांना सामावुन घेण्या करिता नव्याने मंजुर 24 पदां मध्ये 4 लिपीकाची पदे कमी पडतात त्यासाठी महानगरपालिका नियमीत आस्थापने वरील 4 पदांवर नेमणुक देणे योग्य राहील मंजुर वरिष्ठ लिपीकाची पदे नियमीत पदोन्नतीने नंतर भरणे योग्य राहील. तसेच कांही कर्मचा-यांची वय विहित मर्यादेपेक्षा कमी / जास्त आहे त्यास शासनास प्रस्ताव पाठवुन शिथीलता घ्यावी लागेल असे द्विय सदस्य समितीने नमुद केले होते.<br>मनपा सर्व साधारण सभा ठराव क्रं.37 दि. 30.06.2011 व्दारे 24 कर्मचा-यांचा प्रस्ताव ज्यात 4 वरिष्ठ लिपीक 11 लिपीक व 9 शिपायी याप्रमाणे शासनाकडे पद मंजुरीस्तव पाठविण्यात आला होता त्यास शासनाने त्यांचे निर्णय क्रं. 2010/514/ प्र.क्र.86/07/नवि-24 दि. 3 जुलै 2010 अन्वये प्रस्तावास मंजुरी दिलेली आहे. द्विसदस्यीय समितीच्या अहवालानुसार शासनाने मंजुरी दिलेल्या पदापैकी 4 वरिष्ठ लिपीकांची पदे हि नांदेड महानगरपालिका आस्थापनेकडे वर्ग करण्यास व त्याबदल्यात नांदेड मनपा आस्थापनेवरील 4 लिपीक वर्गीय पदे या पदात वर्ग करण्यास प्रशासकीय मान्यता व दोन्ही तरोडयातील कार्यरत एकूण 24 कर्मचा-यांना कर्मचा-यांना मनपा सेवेत शासन आदेशाच्या दिनांका पासुन सामावुन घेण्यास मान्यता प्रदान केली आहे.<br>ठरावाच्या अनुषंगाने सदरील प्रकरणात वरील बाब प्रशासनाच्या निदर्शनास आल्यानंतर कार्यालयीन आ.क्रं. 3446/11 दिनांक 29.08.11 अन्वये लिपीक-8 व शिपायी-3 कर्मचा-यांना व का.आ.क्रं. 10673/12 दि. 23.01.2012 अन्वये लिपीक-6 व शिपायी-3 कर्मचा-यांना सेवेत सामावुन घेण्या बाबत आदेश निर्गमीत केले.<br>तथापि उर्वरीत 4 कर्मचा-यांचे आदेश निर्गमीत करणे बाबत त्यांचे नियुक्तीच्या वेळसचे वय व वाढीव वय शासनाकडुन क्षमापित करून घेणे आवश्यक असल्यामुळे नियमातील तरतुदीनुसार सर्व साधारण सभेची मान्यता घेणे आवश्यक असल्यामुळे त्यासाठी प्रशासकिय प्रस्ताव सर्व साधारण सभे समोर सादर करणे आवश्यक होते. त्यामुळे दिनांक 23.01.12 रोजी प्रस्ताव सर्व साधारण सभे समोर सादर केला त्यास सर्व साधारण सभेने ठराव क्रं. 169 दि. 15.03.2012 अन्वये जास्तीचे वय क्षमापित करणे बाबत |

| | | |
|---|---|---|
| | | मंजुरी दिली व प्रशासनाच्या प्रशासकिय टिप्पणीत नमुद नसतांनाही सदर ठरावात 4 कर्मचा-यांना शासन मान्यतेनुसार वरिष्ठ लिपीक या पदावर नियुक्ती देण्याची प्रशासकिय मान्यता दिली होती.<br>सर्व साधारण सभेच्या ठरावाच्या अनुषंगाने लिपीक-1, शिपायी-3 असे एकूण 4 कर्मचा-यांचे वय क्षमापित करणे बाबत मा. प्रधानसचिव नगरविकास विभाग मंत्रालय मुंबई याना का.पत्र क्रं. 364/12 दिनांक 21.04.2012 अन्वये प्रस्ताव शासनास सादर केला. व तसेच प्रशासकिय टिप्पणी विरुध्द सर्व साधारण सभेने ठराव क्रं. 169 दि. 15.03.2012 मध्ये 4 कर्मचा-यांना शासन मान्यतेनुसार वरिष्ठ लिपीक या पदावर नियुक्ती देण्याची प्रशासकिय मान्यता दिल्यामुळे सदरील ठरावातील तो अंशत: भाग विखंडीत करण्या बाबत या कार्यालयाचे पत्र क्रं. 2304/12 दि. 10.07.12 अन्वये शासनास पाठविण्यात आलेला आहे.<br>शासनाने त्यांचे पत्र क्रं. नामपा-2012/सक-334 /नवि-24 दि. 23 एप्रिल 2012 अन्वये नियुक्ती प्राधिकारी म्हणुन आयुक्त महानगरपालिका हे या नियुक्तीबाबत सक्षम आहेत असे कळविल्यामुळे का.आ.क्रं. 1393/12 दि. 08.06.2012 अन्वये लिपीक-1 व शिपायी-3 या कर्मचा-यांना सेवेत सामावुन घेण्याची कार्यवाही करण्यात आली.<br>जेकी सदरची बाब सुरुवातीलाच श्री सुरेश गोविंदराव कुलकर्णी तत्कालीन प्र. कार्यालय अधिक्षक यांनी शासनास कळविणे अपेक्षीत होते ते केले नाही. तसेच का.पत्र क्रं. 8854/13 दि. 27.02.13 अन्वय ठराव क्रं. 169 दि. 15.03.12 अन्वये अंशत: ठराव विखंडीत करण्या बाबत पुनश्च विनंती करण्यात आली<br>ग्रामपंचायतीतील कार्यरत 4 कर्मचा-यांना वरिष्ठ लिपीक पदावर सेवेत सामावुन न घेतल्यामुळे संबंधीत कर्मचा-यांनी मा. उच्च न्यायालय खंडपिठ औरंगाबाद येथे याचिका क्रं. 1342/2012 नुसार दाखल केली आहे सदरचे प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे. |
| 6 | मा. उच्च न्यायालय येथील याचिका क्रं. 1342/2012 मध्ये दि. 12 सप्टेंबर 2012 रोजी शासनास सहा आठवाडयाच्या आत प्रकरणाची तपासणी करुन निर्णय देणे बाबत निर्देश झाले होते. या निर्देशानुसार नगरविकास विभागाने दि. 30 एप्रिल 2013 च्या पत्राव्दारे शासनाव्दारे शासनाचे दिनांक 30.07.2010 रोजीचे आदेश क्रं. 2010/514/प्र.क्र.-86/07/नवि-24 हे नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेने केलेल्या सर्व साधारण सभा ठराव क्रं. 83 दि. 18.08.09 नुसार दिलेली समंती विचारात घेवुन | सदरील 4 कर्मचा-यांना वरिष्ठ लिपीक पदावर सामावुन घेण्या बाबतचे प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.<br>परंतु लिपीक-1 व शिपायी-3 असे एकूण 4 कर्मचा-यांचे सेवेत सामावुन घेणे बाबत वय क्षमापित करण्याचा प्रस्ताव सर्व साधारण सभे समोर सादर केला होता परंतु त्या व्यतीरिक्त परस्पर सर्व साधारण सभेने 4 कर्मचा-यांना वरिष्ठ लिपीक या पदावर सामावुन घेण्या बाबत प्रशासनाने दिलेल्या प्रशासकिय टिप्पणीच्या विरोधात ठराव क्रं. 169 दिनांक 15.03.2012 मध्ये समावेश करुन मान्यता प्रदान केल्यामुळे सदरचा 4 कर्मचा- |

| | | |
|---|---|---|
| | तसेच या बाबतच्या नियमाच्या सर्व तरतुदी विचारात घेवुन काढण्यात आले आहे. प्रस्तुत प्रकरणी शासनाच्या दि. 03 जुलै 2010 च्या शासन निर्णयानुसार कार्यवाही होणे आवश्यक असल्याचे कळविले आहे. | यांना वरिष्ठ लिपीक पदावर सामावुन घेणे बाबतचा ठरावातील अंशतः भाग विखंडीत करणे बाबत प्रस्ताव शासनास सादर केला असुन त्या बाबत उपसचिव, नगरविकास विभाग मंत्रालय मुंबई यांनी 30 एप्रिल 2013 च्या पत्राव्दारे मान्य करता येत नाही असे कळविले होते.<br>परंतु एकूण सर्व बाबींचा विचार करता या प्रकरणात अनियमीतता झाल्याचे अपिलकर्ता श्री सुरेश गोविंदराव कुलकर्णी यांची विभागीय चौकशीत निश्पन्न झाले आहे. व ही बाब पुढे आल्यामुळे आयुक्त यांनी कार्यालयीन अर्धशासकिय पत्र क्रं. आस्था-1/21713/13 दि. 02.12.2013 अन्वये मा. प्रधान सचिव, नगरविकास विभाग मंत्रालय मुंबई यांना मनपा सर्व साधारण सभा ठराव क्रं. 169 दि. 15.03.12 मधील अंशतः ठराव विखंडीत करणे बाबतः पुर्नर विनंती केली आहे. व ही बाब मा.उच्च न्यायालय खंडपिठ औरंगाबाद येथे कळविण्या बाबत मनपा कायदे सल्लागार यांना कळविण्यात आले आहे. |
| 7 | तसेच शासनानी नियुक्तीच्या दिनांकास अधिकचे वय क्षमापित करणे बाबत दि. 23 एप्रिल 2012 चे पत्राव्दारे शासन निर्णय नावाशमनपा/2010/514/प्र.क्र.86/07/नवि-24 अन्वये कर्मचा-यांच्या सेवा सामावुन घेण्यास मान्यता दिलेली असुन मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 493 संक्रमणकालीन तरतुदीनुसार परिशिष्ट-4 मधील भाग-1 नियम 5 (क) नुसार स्थानिक प्राधिकरणाचा समावेश झालेल्या भागातील त्या तारखे पुर्वीच्या सर्व नेमणुका महानगरपालिकेच्या होत्या असे गृहीत धरुन सेवा सामावुन घेतले आहे.त्यानुसार नियुक्ती प्राधिकरण म्हणुन आयुक्त महापालिका हे सक्षम असल्याचे कळविले आहे. | सदरची बाब पदनिर्मितीच्या प्रस्तावाच्या वेळी शासनास सादर करणे आवश्यक होते परंतु श्री सुरेश गोविंदराव कुलकर्णी तत्कालीन प्र. कार्यालय अधिक्षक यांनी नमुद न केल्यामुळे प्रशासना मार्फत पुनश्च सर्व साधारण सभेच्या मान्यतेने ठराव पारीत करुन शासनास प्रस्ताव पाठविल्यानंतर शासनाने सदर प्रकरणात आयुक्त सक्षम असल्याचे कळविले आहे. त्यानुसार सदर कर्मचा-यांना सेवेत सामावुन घेण्याची कार्यवाही करावी लागली. |
| 8 | शास्तीच्या आदेशा मध्ये सदर प्रकरणाची संचिका सहाय्यक आयुक्त (आस्थापना) यांच्या मार्फत सादर न करता रास्तपणे उपआयुक्त व आयुक्तांकडे सादर केल्याचा दोष नमुद करण्यात आला आहे परंतु या बाबत मी नमुद करु इच्छितो की तत्कालीन मा. आयुक्त, मा. उपआयुक्त अथवा शासनाने कधीही आक्षेप घेतलेला आहे. | सदरील प्रकरणी तत्कालीन आयुक्त यांनी तत्कालीन उपआयुक्त व सहाय्यक आयुक्त आस्थापना यांचा खुलासा मागविला होता.त्या संदर्भात तत्कालीन उपआयुक्त व सहाय्यक आयुक्त(आस्था) यांनी खुलासा सादर केला असुन सहाय्यक आयुक्त(आस्था) यांनी संचिकेत काढलेल्या त्रुटी नंतर संचिका त्यांच्या मार्फत सादर झालेली नाही. तसे संचिकेतील परिच्छेद क्रं.26 मध्ये सहाय्यक आयुक्त (आस्था)यांनी पृष्ठाकन केलेले आहे. तसेच 24 कर्मचारी मनपाकेत सामावुन घेण्याचा प्रस्तावनियमानुसार नगरसचिवा मार्फत सादर केलेला नाही ही बाब द्विय समिती व विभागीय चौकशीत सिध्द झाले त्यामुळे संबंधीतांचे म्हणणे चुकीचे आहे. |

श्री सुरेश गोविंदराव कुलकर्णी तत्कालीन प्रभारी कार्यालय अधिक्षक यांना कार्यालयीन आदेश क्रं. साप्रवि/आस्था-3/3445/11 दि. 29.08.2011 च्या आदेशान्वये तरोडा बु. व तरोडा खु. ग्रामपंचायती मध्ये कार्यरत कर्मचा-यांना मनपा सेवेत सामावुन घेतांना झालेल्या अनियमीतते बाबत व चौकशी समितीच्या चौकशी अहवालानुसार कार्यवाहीतील त्रुटी बाबत

निलंबीत करण्यात आले होते. संबंधीतांनी दिनांक 19.09.2011 रोजी विनंती अर्ज सादर करुन कामावर पुनस्थापित करण्याची विनंती केली होती. प्रस्तत निलंबन प्रकरणी संबंधीतास कार्यालयीन ज्ञापन क्रं. आस्था-6/4433/11 दिनांक 05.10.2011 अन्वये ज्ञापन व जोडपत्रा 1 ते 4 बजावण्यात आले असता त्या पित्यर्थ संबंधीतांनी दिनांक 05.10.2011 खुलासा सादर करुन त्यांच्यावर ठेवण्यात आलेले दोषरोप अमान्य केले. संबंधीतांनी विनंती केल्यानुसार संबंधीतास का.आ. क्रं. साप्रवि/आस्था-6/4689/11 दि. 11.10.2011 अन्वये विभागीय चौकशीच्या अधिन राहुन कामावर पुनस्थापित करण्यात आले. का.आ.क्रं. आस्था-6/4690/11 दि. 11.10.2011 अन्वये संबंधीतांनी दोषारोप अमान्य केल्यामुळे संबंधीता विरुध्द विभागीय चौकशी आरंभविणेसाठी चौकशी अधिकारी व सादर कर्ता अधिकारी यांची नियुक्ती करण्यात आली. चौकशी अधिकारी यांचा अहवाल क्रं 2012/वि.चौ.सिआर-194 दि. 13.05.2013 अन्वये विभागीय चौकशी अंती चौकशी अधिकारी यांनी चौकशी अहवाल सादर करुन ग्राम पंचायत तरोडा बु. व तरोडा खु. मधील 24 कर्मचा-यांना मनपा नांदेड सेवेत 4 वरिष्ठ लिपीक पदासह मनपा ठराव व शासन मान्यतेने सामावुन घेण्यात आले. सदरील कर्मचारी सामावुन घेण्याचा प्रस्ताव सविस्तर कर्मचा-यांचे नांव, वय व शिक्षणासह शासनास सादर करणे आवश्यक होते त्यात ग्राम पंचायतीकडील नेमणुकीच्या वेळी वय जास्त होते किंवा कमी होते याची शासनास संपुर्ण माहिती देवुन शिथीलता मान्य करुन घ्यावयायची होती परंतु असे घडले नाही. तसेच तत्कालीन सहाय्यक आयुक्त (आस्थापना) यांनी काढलेल्या त्रुटी नंतर संचिका त्यांच्या मार्फत परत सादर झालेली नाही. 24 कर्मचारी मनपाकेत सामावुन घेण्याचा प्रस्ताव नियमानुसार नगरसचिव मार्फत सादर केलेला नाही हया बाबी नमुद केले आहे. तदनंतर संबंधीतास वरील चौकशी अहवालावर आपली बाजु मांडण्यासाठी का.पत्र क्रं. साप्रवि/आस्था-1/ 7837/13 दि. 19.07.2013 अन्वये प्रशासना मार्फत सुनावणी घेण्यात आली. **संबंधीतानी सुनावणीत दोषारोपात तरोडा बु. व तरोडा खु ग्रामपंचायती मधील कार्यरत कर्मचा-यांना मनपा सेवेत सामावुन घेतांना झालेल्या अनियमीतते बाबत मान्य केले. नैसर्गीक न्यायाच्या दृष्टीने संबंधीतास बाजु मांडण्याची संधी देण्यात आली. शासनास अपुर्ण माहिती सादर केली अशा प्रकारे दोषारोप सिध्द होतात.** उक्त अहवालानुसार संबंधीत हे प्रस्तुत निलंबन प्रकरणी दोषी असल्याचे सिध्द होत असुन सदर बाबी अतिशय गंभीर स्वरुपाची असुन कार्यालयीन कामकाजात व शिस्त यांना काळीमा फासणारी आहे. उवक्त सर्व बाबीं विचारात घेता निलंबन प्रकरणी शास्ती म्हणुन मुंबइ्र प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 56 (2) (क) अन्वये खालच्या पदावर किंवा खालच्या समयश्रेणीत आणणे किंवा खालच्या टप्प्यावर आणण्याच्या तरतुदीनुसार संबंधीतास कार्यालीयन आदेश क्रं. साप्रवि/आस्था-6/17973/13 दिनांक 24.10.2013 अन्वये लिपीक या पदाच्या मुळ वेतनश्रेणी म्हणजेच सुरुवातीच्या वेतनश्रेणी रु. 5200 ग्रेडपे 1900 यावर आणण्यात आले. सदरील आदेशा विरोधात संबंधीतानी मा. उच्च न्यायालय खंडपिठ औरंगाबाद येथे याचिका क्रं. 9224/2013 नुसार दाखल केली असता मा. न्यायालयाने संबंधीतांनी अर्ज मागे घेवुन अपिलीय प्राधिकरणाकडे अपिल करण्याचे आदेशीत केल्यामुळे संबंधीने मनपा स्थायी समितीकडे दिनांक 20.11.2013 रोजी अपिल केले आहेत. व सोबतच अर्जदाराने प्रशासनाचे प्रमुख या नात्यांने आयुक्त यांच्याकडे पुनरिक्षण व पुनर्विलोकन विनंती अर्ज केले होते संबंधीतांचा अर्ज सुध्दा नियमात बसत नाही कायदया प्रमाणे आयुक्त यांचे आदेशाचे अपिलही स्थायी समितीकडे असल्याने संबंधीताचा पुनरिक्षण व पुनर्विलोकन अर्ज फेटाळण्यात आला आहे. करीता सदरील प्रकरणी वरील सर्व बाबी विचारात घेवुन प्रशासनाने केलेली कार्यवाही नियमानुसार करण्यात आलेली असुन प्रशासनाने केलेली कार्यवही संयुक्तीक असल्यामुळे संबंधीतांनी केलेले अपिल फेटाळण्यात यावे

**सरजितसिंघ गिल** दोन्ही तरोडयातील ग्रामपंचायतमध्ये कार्यरत २४ कर्मचाऱ्यांना महानगरपालिका सेवेत सामावून घेण्यास महासभेने मान्यता देवून त्यास मान्यता देण्यासाठी प्रस्ताव शासनास सादर करण्यात आला होता शासनानेही आयुक्तांनी महासभेच्या ठरावानुसार शिफारस केल्यानुसार प्रस्तावास मान्यता दिलेली आहे व त्यानुसार या २४ कर्मचाऱ्यांना महानगरपालिका सेवेत कायम करुन घेतलेले आहे. संपूर्ण प्रक्रिया नियमानुसार पार पडलेली असतांना तब्ब्ल दोन वर्षानंतर अधिकारी व कर्मचाऱ्यांना सोडून शासनास सादर करण्यात आलेल्या प्रस्तावात अनियमितता झाली म्हणून फक्त श्री सुरेश कुलकर्णी यांना जबाबदार धरुन त्यांना शास्ती लावणे नियमास धरुन नाही त्यामुळे आयुक्तांनी त्यांना पदावनत करण्याची जी शास्ती लावलेली आहे ती रद्दबातल करण्यात यावी व त्यांना पुर्ववत पुर्वीच्या पदावर कायम ठेवण्यात यावे असा माझा प्रस्ताव आहे.

**गफारखान** श्री सरजितसिंघ गिल यांनी जो प्रस्ताव मांडला त्यास माझे अनुमोदन आहे. श्री सुरेश कुलकर्णी यांना लावण्यात आलेली शास्ती रद्द करण्यात यावी.

**अ.हबीब अ.रहिम बागवान** श्री सुरेश कुलकर्णी यांचेवर लादण्यात आलेली अन्यायकारक शास्ती रद्द करण्यात यावी.

**उपआयुक्त अस्थापना** श्री कुलकर्णी यांनी त्यांचे वर लादलेल्या शास्ती विरुध्द स्थायी समितीसमोर जे अपील केलेले आहे त्यावर प्रशासनामार्फत सविस्तर अभिप्राय दिलेला आहे. तरोडा ग्रामपंचायत कार्यालयात कार्यरत २४ कर्मचा-यांना महानगरपालिका सेवेत सामावून घेण्याचा जो प्रस्ताव महासभेत ठेवण्यात आला तो प्रशासनामार्फत/नगरसचिवा मार्फत ठेवण्यात आला नव्हता स.सदस्यांनी आयत्या वेळी परस्पर महासभेत प्रस्ताव ठेवला होता या प्रस्तावावर प्रशासनाचे कोणतेही मत विचारात घेण्यात आले नव्हते शासनास जो प्रस्ताव सादर करण्यात आला होता त्यामध्ये **सविस्तर कर्मचा-यांचे नांव, वय व शिक्षणासह शासनास सादर करणे आवश्यक होते त्यात ग्राम पंचायतीकडील नेमणुकीच्या वेळी वय जास्त होते किंवा कमी होते याची शासनास संपुर्ण माहिती देवुन शिथीलता मान्य करुन घ्यावयायची होती परंतु असे घडले नाही. तसेच तत्कालीन सहाय्यक आयुक्त (आस्थापना) यांनी काढलेल्या त्रुटी नंतर संचिका त्यांच्या मार्फत परत सादर झालेली नाही.** त्यामूळे प्रकणाची सविस्तर चौकशी करण्यासाठी चौकशी अधिकारी नेमून चौकशी करण्यात आली .व चौकशी अधिका-यांच्या अहवालानूसार शास्ती लावण्यात आलेली ती निमयानूसार आहे.श्री कुलकर्णी यांचे अपिल फेटाळण्यात यावे असे प्रशासनाचे मत आहे.चार कर्मचा-याना वरिष्ठ लिपिक पदावर सामावुन घेण्याबाबतचे प्रकरण उच्च न्यायायालयात चालू असून उच्च न्यायालयाने याप्रकरणाची तपासणी करुन सहा महिण्याचे आत निर्णय घेण्याचे निर्देश दिलेले आहे.

**सरजितसिंघ गिल** महासभेने आयत्या वेळेस घेतलेला ठराव बेकायदेशिर होता तर तो विखंडीत करण्यासाठी शासनास शिफारस करावयास पाहिजे होती प्रशासनाने ठरावाची अमलबजावणी केलेली आहे व महासभेच्या ठरावानूसार शासनाने मान्यता दिलेली आहे. हायकोर्टाचे निर्णयानूसार व महानगरपालिका अधिनियमातील तरतूदीनूसार स्थायी समितीला शास्ती कमी करण्याचे,रद्द करण्याचे अधिकार आहे. श्री सुरेश कुलकर्णी यांचे स्वाक्षरीने शासनास प्रस्ताव सादर करण्यात आलेला नाही श्री सुरेश कुलकर्णी यांनी जी काही कागदपत्रे.पुरावे सादर केलेले आहेत त्यावरुन श्री सुरेश कुलकर्णी यांचेवर जी अन्यायकारक शास्ती लादलेली आहे ती अयोग्य आहे म्हणून त्याची शास्ती रद्दबातल करण्यात यावी .

**सभापती** श्री सुरेश कुलकर्णी. यांचे अपिलावर श्री सरजितसिंध गिल यांनी मांडलेला प्रस्ताव मंजुर करण्यात येतो. व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**ठराव क्र. २०७** **ठराव**

श्री सुरेश गोंविंदराव कुलकर्णी, लिपिक मनपा नांदेड यांनी नांवाशमनपा स्थायी समिती समोर त्यांना लादलेल्या शिक्षे विरुध्द केलेल्या अपिलावर व या अपिलाच्या अनुषंगाने आयुक्त, नांवाशमनपा नांदेड यांनी दिलेल्या प्रशासकीय अहवालावर सविस्तर विचार करण्यात आला, तरोडा (बु.) व तरोडा (खु.) या दोन ग्रामपंचायतीतील कार्यरत २४ कर्मचाऱ्यांना महानगरपालिका सेवेत सामावून घेण्याच्या प्रकरणात श्री सुरेश कुलकर्णी यांना दोषी ठरवून नांवामनपा आदेश क्र.नांवाशमनपा /साप्रवि/अस्था-६/१७९७३/२०१३ दि.२४.१०.२०१३ अन्वये लिपीक यापदाच्या मूळ वेतनश्रेणीत म्हणजेच सुरवातीच्या वेतनश्रेणीत रु.५२०० अधिक ग्रेड पे १९०० यावर आणण्याची शास्ती लावलेली आहे.परंतु त्यांनी स्थायी समितीला जी कागदपत्रे व पुरावे सादर केले त्यावरुन असे दिसून येते की त्यांना लावण्यात आलेली शास्ती अयोग्य आहे. करीता मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ५६(४) अन्वये स्थायी समितीस प्राप्त असलेल्या अधिकारानूसार श्री सुरेश कुलकर्णी,लिपिक नांवाशमनपा नांदेड यांना आदेश क्र.नांवाशमनपा /साप्रवि/अस्था-६/१७९७३/२०१३ दि.२४.१०.२०१३ अन्वये लिपीक यापदाच्या मूळ वेतनश्रेणीत म्हणजेच सुरवातीच्या वेतनश्रेणीत रु.५२०० अधिक ग्रेड पे १९०० यावर आणण्याची शास्ती ही नांवामनपा स्थायी समितीची सभा सर्वानुमते रद्दबातल करते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो. नियमानुसार आयुक्तांनी पुढील वैधानिक कार्यवाही करावी.

**विषय क्र.३१**

प्र.क्र. २६ व २४ मध्ये बऱ्याच विद्युत खांबावर पथदिवे नसल्याने रात्री चोऱ्यांचे प्रमाण वाढले आहे तसेच अंधारामुळे पावसाळयात सुध्दा विषारी जीवांचा वावर वाढल्यामुळे अपघात घडत आहे. तरी प्र.क्र. २४ व २६ मध्ये प्रत्येकी ५० दिवे बसविण्यासाठी प्रशासकिय व आर्थिक मंजुरी करीता स्थायी समितीसमोर सादर.

**सुचक :-** अ. हबीब अ. रहीम बागवान **अनुमोदक :-** शेख हबीब बावजीर

**सभापती** स.सदस्यांचा प्रस्ताव मंजुर करण्यात येतो व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**ठराव क्र.२०८** **ठराव**

प्रभाग क्र. २६ व २४ मध्ये बऱ्याच विद्युत खांबावर पथदिवे नसल्याने रात्री चोऱ्यांचे प्रमाण वाढले आहे तसेच अंधारामुळे पावसाळयात सुध्दा विषारी जीवांचा वावर वाढल्यामुळे अपघात घडत आहे. तरी प्र.क्र. २४ व २६ मध्ये प्रत्येकी ५०

दिवे बसविण्यासाठी लागणा-या खर्चास प्रशासकिय व आर्थिक मान्यता हि नांवामनपा स्थायी समितीची सभासर्वानुमते देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**<u>विशेष बाब म्हणून आयत्या वेळी घेण्यात आलेले तातडीचे विषय</u>**

**विषय :-१**

नांवामनपाकेच्या अधिकारी/कर्मचारी यांना एकमेकाशी तातडीने संपर्क साधता यावा याकरीता महानगरपालिकेने मासिक खर्चाची मर्यादा ठरवून देवून सिमकार्ड दिले आहेत यापैकी ५० भ्रमणध्वनी धारकांच्या सिमकार्ड करीता मोबाईल ट्रॅकीग सिस्टीम कार्यान्वीत करावयाची असून सदर काम तातडीचे असल्यामूळे या कामी सादर झालेल्या (३) दरपत्रकापैकी AppBell technologies pvt.pune यांनी याबाबत होणा-या खर्चाकरीता रु.८१०००/-दर दर्शविला होता संबंधिताशी वाटाघाटी करुन सदर रु.८००००/-दर मान्य केला आहे.

तरी सदरील खर्चाकरीता स्थायी समितीची कार्योत्तर मान्यता आवश्यक असल्यामूळे स्थायी समिती सभेसमोर प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**सभापती** आयुक्तांचे प्रस्तावास मान्यता देण्यात येते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो

**ठराव क्र.२०९** **ठराव**

नांवामनपाकेच्या अधिकारी/कर्मचारी यांना एकमेकाशी तातडीने संपर्क साधता यावा याकरीता महानगरपालिकेने मासिक खर्चाची मर्यादा ठरवून देवून सिमकार्ड दिले आहेत यापैकी ५० भ्रमणध्वनी धारकांच्या सिमकार्ड करीता मोबाईल ट्रॅकीग सिस्टीम कार्यान्वीत करावयाची असून सदर काम तातडीचे असल्यामूळे या कामी सादर झालेल्या (३) दरपत्रकापैकी AppBell technologies pvt.pune यांनी याबाबत होणा-या खर्चाकरीता रु.८१०००/-दर दर्शविला होता संबंधिताशी वाटाघाटी करुन सदर रु.८००००/-दर मान्य केला आहे.करीता मोबाईल ट्रॅकीग सिस्टीम कार्यान्वीत करण्याकरीता AppBell technologies pvt.pune यांचे वाटाधाटी अंतीचे सर्वात कमी दराचे रु.८००००/-दरपत्रक मंजुर करण्यास ही नांवामनपा स्थायी समितीची सभा सर्वानुमत मान्यता देते.व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**सरजितसिंघ गिल.** माझ्या प्रभागातील दारुल उलूम चॉद मस्जीद जवळील नाली बंद होवून नालीतील घाणपाणी रस्त्यावर वहात असल्यामूळे नागरीकांच्या आरोग्यास धोका निर्माण झाला आहे करीता सदरील नाली तातडीने दुरुस्त करण्यासाठी लागणा-या खर्चास प्रशासकीय व आर्थिक मान्यता देण्यात यावी.

**गफारखान** या प्रस्तावास माझे अनुमोदन आहे.

**सभापती** श्री सरजितसिंध गिल यांनी मांडलेल्या प्रस्तावास मान्यता देण्यात येते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो

**ठराव क्र.२१०** **ठराव**

नांवामनपा हद्दीतील प्रभाग २३ मधील दारुल उलूम चॉद मस्जीद जवळील नाली बंद होवून नालीतील घाणपाणी रस्त्यावर वहात असल्यामूळे नागरीकांच्या आरोग्यास धोका निर्माण झाला आहे करीता सदरील नाली तातडीने दुरुस्त करण्यासाठी लागणा-या खर्चास प्रशासकीय व आर्थिक मान्यता ही नांवाशमनपा स्थायी समितीची सभा सर्वानुमते देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**सभापती** आजच्या सभेचे कामकाज संपल्यामुळे आजची सभा संपल्याचे जाहिर करण्यात येते.

**स्वाक्षरीत/-**
**सभापती,**
स्थायी समिती,
नांवाशमनपा नांदेड

**स्वाक्षरीत/-**
**नगरसचिव,**
नांवाशमनपा नांदेड